RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# नागपूर शहरातील दिव्यांग व्यक्तींसाठी तयार पोशाखांचा त्यांच्या आत्मविश्वास व मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम

अर्चना दयाराम दंढारे (हनवतकर)
पी.एच.डी.स्कॉलर
गृहअर्थशास्त्र,(HomeEconomics)
महिलामहाविद्यालय,नंदनवन,नागपूर
Email : archanahanwatkar@gmail.com

---

**सार :**

*दिव्यांग व्यक्तींकरीता तयार पोशाखांचा त्यांच्या जीवनावर काय परिणाम होतो याचा अभ्यास यात केला आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी खास तयार केलेले पोशाख त्यांना अधिक आरामदायक आणि सोयिस्कर वाटतात त्यामुळे त्यांना सामाजिक ठिकाणी अधिक आत्मविश्वासाने वावरता येते. अशा पोशाखांमुळे ते इतरांसारखे सामजिक जीवन जगू शकतात. दिव्यांगत्वामुळे होणारे शारिरीक व मानसिक त्रास कमी करण्यास मदत करतात. तसेच समाजात समान वागणूक मिळते व सकारात्मकता वाढते. ते अधिक आनंदी राहून मानसिक आरोग्य स्थिर राहण्यास मदत करते. दैनंदिन कामे सहज करता आल्याने स्वतंत्र आणि स्वावलंबी बनतात. त्यामुळे ते स्वतःला अधिक सक्षम आणि समाधानी मानतात. अशाप्रकारे दिव्यांग व्यक्तींचे मानसिक स्वास्थ चांगले राहण्यास मदत होते.*

---

**प्रस्तावना :**

आजच्या धकाधकीच्या जिवनात असे दिसुन येते की, प्रत्येकाला घाई असते. त्यात युवावर्गाला गाडी चालविण्याची घाई असते. आजकालच्या गाड्या हि इतक्या हायटेक आहेत की त्यांची गतीही फार जास्त असते. त्यामुळे अनेक वेळा अपघात होतात. त्यात ट्रैफिक नियमांचे पालनसुध्दा करीत नाही.

अपघात हा कुठेही होतो. त्यात अनेक व्यक्ती मरण पावतात तर काही व्यक्तींना कायमचे दिव्यांगत्व प्राप्त होते. या अपघातामध्ये हातपाय निकामी होतात, सांध्ये तुटतात, खांद्यापासुन हात तुटतो, काहींना जन्मजात पोलीयो झालेला असतो. काहींचे पुर्ण शरीरच निकामी होते व त्यांचे पुर्ण आयुष्यच त्यांना बेडवर किंवा व्हिलचेअरवर घालवावे लागते. आज दिव्यांग व्यक्ती तणावात आहे. आपल्यात काही कमी आहे असे सतत त्यांना जाणवत असते.

**आरोग्य :**

आजच्या फॅशनच्या जगात नवनवीन फॅशन उपलब्ध आहे. परंतु त्यांच्या दिव्यांग मुळे त्यांना ते परिधान

करता येत नाही आणि त्यामुळे नैराश्य प्राप्त होते.

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) आरोग्याची व्याख्या पूढीलप्रमाणे सांगीतली आहे. "आरोग्य म्हणजे केवळ आजार किवा अपंगत्व याचा अभाव एवढेच नसून शारिरीक, मानसिक, सामाजिक सुस्थीती म्हणजे आरोग्य होय."

आरोग्याचे विविध पैलु पूढीलप्रमाणे आहे.
जसे शारीरीक स्वास्थ
मानसिक स्वास्थ
सामाजिक स्वास्थ
आध्यात्मिक स्वास्थ

आरोग्यावर विविध घटकांचा परिणाम होतो. जसे अनुवंशिकता, शारीरिक वातावरण, सामाजिक वातावरण, मानसिक घटक, आर्थिक दर्जा, राहनीमानाचा स्तर, आरोग्य सेवेचा स्तर, पोषणविषयक स्तर इ. अशा सर्व व्यक्ती करिता त्यांना सुखकर आणि सोयीस्कर जिवन जगता यावे याकरिता आपण त्यांच्यासाठी पोशाख तयार करत आहे.

2011 च्या जनगणनेनुसार भारतात 2.68% दिव्यांग व्यक्ती आहे. हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या 2.21% इतके आहे.

***Source:*** ***www.navarashtra.com*** येथून घेतले आहे.

जागतिक बॅंकेच्या अंदाजानुसार भारतात 4 कोटी दिव्यांग आहेत. नागपूर जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींची एकूण लोकसंख्या 113941 एवढी आहे. यामध्ये अंध, बहीरे, मुके, अपंग व्यक्ती मर्यादीत हालचाल करू शकणारे आणि मानसिक समस्या समाविष्ट असलेले लोक आहेत.

**मानसिक नैराश्यामागचे कारण :**

आजच्या फॅशनच्या जगात नवनवीन फॅशन उपलब्ध आहे. परंतु त्यांच्या दिव्यांगते मुळे त्यांना ते परिधान करता येत नाही आणि त्यामुळे नैराश्य प्राप्त होते.

अशा सर्व व्यक्ती करिता त्यांना सुखकर आणि सोयीस्कर जिवन जगता यावे याकरिता आपण त्यांच्यासाठी पोशाख तयार करत आहे.

**फॅशन :**

डॉ. उज्वला वैरागडे यांच्यामते- “फॅशन हे एक कला आहे. रंग पोत डिझाईन या सर्वांना लक्षात घेऊन एखादया व्यक्तीसाठी त्याचे व्यक्तीमत्त्व अधिकाधिक खुलवण्यासाठी तयार केलेली डिझाइन होय.”

हात व पायाने दिव्यांग व्यक्तीचे व्यक्तीमत्त्व अधिकाधिक खुलवण्यास फॅशनयुक्त पोशाख तयार करणे.

दिव्यांग व्यक्तीवर स्वास्थावर त्यांच्या शारीरिक, मानसिक बरेच संशोधन झाले आहे. त्यांच्या मानसिक नैराश्यावर होणाऱ्या परिणामाकडे दुर्लक्ष केले जाते.

या दिव्यांगते मुळे जेव्हा लहान सहान दैनंदिन कामे अतिशय कठीण होऊन जातात. त्यामुळे नैराश्य प्राप्त होते. त्यांना आपल्या दिव्यांगते मुळे समाजात वावरतांना आपल्यात काही कमी आहे असे सतत जाणवत असते . प्रत्येक कामासाठी त्यांना दुसऱ्यांची मदत घ्यावी लागते.

माझा अपघात झाला असतांना माझ्या हातात रॉड टाकलेला होता त्यावेळी मला वस्त्र परीधान करतांना ,बटन, झिप लावतांना अतिशय कठीण होत होते. अशा परीस्थितीत मला आपल्या सारख्या दिव्यांग व्यक्तींचे दुःख कळले . त्यांच्या व्यथा व त्यातुन आलेले नैराश्य कळले. या परीस्थितीवरून मी त्यांच्या या समस्येवर उपाय शोधायला सुरूवात केली.

समाजात, लग्नसमारंभात जातांना किंवा ऑफिस मध्ये जातांना त्यांना त्यांचे दिव्यांग लपविणारे व त्यांना सोयीस्कर असे कपडे आज बाजारात उपलब्ध नाहीत.

समाजातील सर्व स्थरावरील कुटुंबामधले दिव्यांग व्यक्तींना कार्यसमारंभ व बाहेरील कामावर जाताना वापरण्यायोग्य पोशाख राहिल.

प्रस्तुत संशोधना दिव्यांग स्त्री - पुरुषांचे मानसिक नैराश्यामागचे मुख्य कारण काय हे शोधणे त्यांना पोशाख परिधान करताना येणाऱ्या समस्या सोडविणे व त्यांचे व्यक्तीमत्त्व खुलवण्यास मदत करणे.

समाजात रूढी परंपरागंत काही पोशाख परिधान केली जातात ते दिव्यांग व्यक्तीना स्वतः घालता येईन

**समस्या आणि गरजा** :

- **समानता:** दिव्यांग व्यक्तींनाही फॅशनेबल आणि आकर्षक दिसण्याचा अधिकार आहे.
- **सुविधा:** दैनंदिन जीवनात वापरण्यास सोपे, आरामदायक आणि सुरक्षित पोशाख आवश्यक आहेत.
- **आत्मविश्वास:** आकर्षक पोशाखामुळे आत्मविश्वास वाढतो आणि समाजात मिसळण्यास मदत होते.
- **विशेष गरजा:** व्हीलचेअर वापरणाऱ्यांसाठी, कृत्रिम अवयव वापरणाऱ्यांसाठी, स्नायूंची दुर्बलता असणाऱ्यांसाठी विशिष्ट डिझाईनची गरज आहे.

**संशोधनाची उदिदष्टे :**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निर्धारीत करण्यात आलेली आहेत.

- नागपूर शहरातील शारीरिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तीचा शैक्षणिक व कुंटुबिक दर्जा अभ्यासाने
- नागपूर शहरातील शारीरिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तीचे सुविधा जनक काम करू शकेल असे आरामदायक व सुखकर हालचालींना मदत करणारे आणि लग्न आणि इतर समारंभात घालावयाचे पोशाख डिझाईन करणे.

Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

- नागपूर शहरातील दिव्यांग व्यक्तीवरील तयार पोषाखाचा परीणाम व त्याचा आत्मविश्वास वाढला का हे जाणून घेणे
- नागपूर शहरातील हात व पायाने दिव्यांग व्यक्तीचे पोषाखा विषयीचे मत अभ्यासणे. व कमी किमतीत पोषाख तयार करण्याचा प्रयत्न करणे.

**गृहितकृत्ये :**

वेबस्टरच्या शब्दकोषात १९५६ च्या आवृतीत गृहितकृत्य या संज्ञेचा अर्थाप्रमाणे " गृहितकृत्य एखादे गृहित धरलेले विधान तत्व किंवा एखादी गृहित धरलेली अट होय." (भांडारकर)

1) कुटुंबाच्या आर्थिक व सामाजिक स्तराचा दिव्यांग व्यक्तीच्या राहणीमाणावर व पोषाख परिधाना वर परिणाम होतो.
2) हात व पायाने दिव्यांग व्यक्तीच्या शिक्षणाचा व कुटुंबाचा त्यांच्या पोषाख परिधाना वर परिणाम होतो.
3) या पोशाखाचा दिव्यांग व्यक्तीच्या कार्यसरली करणावर परिणाम होतो.
4) दिव्यांग व्यक्तीने फॅशनेबल पोशाखा परिधान केल्यामुळे त्यांचे मानसिक नैराश्या कमी होतो.
5) दिव्यांग व्यक्तीने वयानुसार हा पोषाख परिधान केल्यामुळे त्यांना काम करणे सुखकर झाले .

**साहित्य समालोचन (Review of literature) :**

प्रस्तुत संशोधनात विषयाशी संबंधीत झालेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात येईल.

**प्रेरणा सुरी, जुलै २०१६ यांच्या मते :**

दिव्यांग व्हीलचेअर वरील लोकांना जर इतर समाजातील लोकांप्रमाणे फॅशनेबल पोशाख घालता आले तर त्यांना समाजात काम करण्यास मदत होते

***"व्हीलचेअर वापरकर्त्यांसाठी कपड्यांचे मूल्यमापन आवश्यक आहे." -*** (प्रेरणा सुरी जुलै, २०१६)

**संशोधन पध्दती :**

वेबस्टरच्या शब्दकोषात संशोधन या शब्दाचा जो अर्थ देण्यात आला आहे. त्यावरून सामान्य माणसासाठी संशोधनाचा ढोबळ अर्थ काय होतो हे स्पष्ट होते. या शब्द कोषाप्रमाणे संशोधन म्हणजे

***"तथ्ये व तत्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सक किंवा परीक्षण होय. किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पध्दतशिर केलेले परीश्रम." -*** (भांडारकर)

**पोशाख निर्मितीसाठी आवश्यक गोष्टी**

- **डिझाईन** :
  - सुलभ झिपर्स, बटणे आणि वेल्क्रोचा वापर.

  - लवचिक आणि मऊ कापडाचा वापर.
  - व्हीलचेअर वापरणाऱ्यांसाठी बसण्यास आरामदायक डिझाईन.
  - कृत्रिम अवयवांसाठी सहज घालता-येण्याजोगे डिझाईन.
  - स्नायूंची दुर्बलता असणाऱ्यांसाठी कमी वजनाचे आणि सहज हाताळता येणारे डिझाईन.
- **उत्पादन:**
  - स्थानिक टेलर आणि डिझायनर्सना प्रशिक्षण देणे.
  - दिव्यांग व्यक्तींच्या गरजांनुसार सानुकूलित (कस्टमाइज्ड) पोशाख तयार करणे.
  - उत्पादनासाठी उच्च-गुणवत्तेच्या सामग्रीचा वापर.
- **उपलब्धता:**
  - नागपूर शहरातील दुकाने आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर उपलब्धता.
  - स्वयंसेवी संस्था आणि दिव्यांग व्यक्तींच्या संघटनांच्या माध्यमातून वितरण.
  - सरकारी योजनांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य.
- **जागरूकता:**
  - फॅशन शो आणि प्रदर्शनांचे आयोजन.
  - सोशल मीडिया आणि स्थानिक माध्यमांद्वारे प्रचार.
  - दिव्यांग व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम.

**संशोधन क्षेत्र :**

प्रस्तुत संशोधनासाठी दिव्यांग व्यक्तींची शासकीय व खाजगी दवाखाने वे फिजिओथेरपी सेंटरमधील 200 व्यक्तींची नमूना निवड म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे.

| **शहर** | **दिव्यांग असलेली स्त्री** | **दिव्यांग असलेले पुरुष** |
|---|---|---|
| पूर्व नागपूर | 20 | 15 |
| पश्चिम नागपूर | 25 | 16 |
| दक्षिण नागपूर | 20 | 18 |
| उत्तर नागपूर | 22 | 24 |
| मध्य नागपूर | 25 | 15 |
| एकूण | 122 | 88 |

**नमुना निवड (सोयीस्कर) Convenience Sampling** :

प्रस्तुत संशोधनासाठी नागपुर शहरातील **20** ते **40** वयोगटातील दिव्यांग व्यक्तीच्या शासकिय आणि खाजगी दवाखान्यात व फिजियोथेरपी सेंटरमधील हात व पायाने दिव्यांग असलेल्या **200** व्यक्तिचा समावेश करण्यात येईल

**संशोधनाचा आराखडा :**

**प्रायोगिक पद्धतीचा** (Experimental method) व **वर्णनात्मक पद्धतीचा** (Descriptive

method) या संशोधनात अवलंब केला आहे.

**तथ्य संकलन पध्दती व तथ्य संकलनासाठी वापरण्यात येणारी तंत्र :**

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक माहिती प्राप्त करण्यासाठी खालील पध्दतीचा अवलंब केला आहे.

**प्रष्नावली पद्धत :**

दिव्यांग व्यक्तींच्या समस्या समजून त्यांना त्यांच्या दिव्यंगत्वानुसार पोशाख तयार करून दिले. दिलेल्या पोशाखाविषयी त्यांना प्रश्नावलीद्वारे प्रश्न विचारले गेले त्याचा अनुभव कसा होता याचा आढावा घेतला गेला. तयार पोशाखाने दिव्यांग व्यक्तींचा आत्मविष्वास वाढला.

**मुलाखत पद्धत :**

दिव्यांग व्यक्तींची मुलाखत घेऊन त्यांची मापे घेऊन त्यांना जे व्यंग आहे त्यांना आपण काय सुविधा देऊ शकतो हे बघून डिझाईन तयार केले गेले व त्यांना ते परिधान करून कसा अनुभव होता हे जाणून घेतले. असे लक्षात आले की, योग्य पोशाख दिव्यांग व्यक्तींना समाजात समान व्यक्तींप्रमाणे वावरण्यास मदत करते.

**वैद्यकीय तपास :**

दिव्यांग व्यक्तींची आधी वैद्यकीय तपासणी करून त्यांना काय व कुठे त्रास आहे हे समजून घेतले. त्यानुसार डिझाईन तयार केले. तयार पोशाख दिव्यांग व्यक्तीला घालून वैद्यकीय तपासणी केली गेली त्या पोशाखामुळे दिव्यांग व्यक्तीला काही त्रास होत आहे का? हे बघितले गेले. त्यांला त्रास होत असल्यास त्यात सुधारणा करून त्या पोशाखाविषयी अनुभव विचारले गेले. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला असे लक्षात आले.

**उपयुक्तता** :

- **दैनंदिन जीवन:** आरामदायक आणि वापरण्यास सोपे पोशाख दैनंदिन कामांसाठी उपयुक्त ठरतात.
- **सामाजिक कार्यक्रम:** फॅशनेबल पोशाखामुळे आत्मविश्वास वाढतो आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यास मदत होते.
- **नोकरी आणि शिक्षण:** व्यावसायिक आणि औपचारिक पोशाख नोकरी आणि शिक्षणासाठी आवश्यक असतात.
- **खेळ आणि व्यायाम:** खेळ आणि व्यायामासाठी आरामदायी आणि लवचिक पोशाख आवश्यक असतात.

**स्पष्टीकरण आणि चर्चा :**

**आत्मविश्वास वाढला :**

- **समानता आणि समावेशन:**
  - तयार पोशाख दिव्यांग व्यक्तींना समाजात सामान्य व्यक्तींप्रमाणे वावरण्यास मदत करतो.

- यामुळे त्यांना स्वतःबद्दल आत्मविश्वास वाटतो आणि ते समाजात अधिक सहजपणे सहभागी होऊ शकतात.

- **वैयक्तिक अभिव्यक्ती:**
  - योग्य पोशाख दिव्यांग व्यक्तींना त्यांची आवड आणि व्यक्तिमत्त्व व्यक्त करण्याची संधी देतो.
  - यामुळे त्यांना स्वतःची ओळख जपण्यास मदत होते आणि ते अधिक आनंदी राहतात.
- **सकारात्मक प्रतिमा:**
  - चांगला पोशाख दिव्यांग व्यक्तींची समाजात सकारात्मक प्रतिमा निर्माण करतो.
  - यामुळे त्यांना इतरांकडून आदर मिळतो आणि ते अधिक आत्मविश्वासाने जगू शकतात.

**मानसिक आरोग्यावर परिणाम:**

- **ताण कमी करणे:**
  - अयोग्य पोशाखामुळे दिव्यांग व्यक्तींना शारीरिक आणि मानसिक ताण येऊ शकतो.
  - तयार पोशाखामुळे हा ताण कमी होतो आणि ते अधिक शांत राहतात.
- **सामाजिक भीती कमी करणे:**
  - योग्य पोशाख दिव्यांग व्यक्तींना समाजात मिसळण्यास मदत करतो.
  - यामुळे त्यांची सामाजिक भीती कमी होते आणि ते अधिक सामाजिक होतात.
- **आनंद आणि समाधान:**
  - आरामदायी आणि आवडता पोशाख दिव्यांग व्यक्तींना आनंद आणि समाधान देतो.
  - यामुळे त्यांचे मानसिक आरोग्य सुधारते आणि ते अधिक सकारात्मक विचार करतात.

**निष्कर्ष :**

**उपक्रम आणि योजना** :

- **सरकारी योजना:** दिव्यांग व्यक्तींसाठी स्वयंरोजगार योजना, कौशल्य विकास योजना.
- **स्वयंसेवी संस्थांचे उपक्रम:** फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण, रोजगार मेळावे, आर्थिक मदत.
- **वैद्यकीय महाविद्यालयांचे संशोधन:** दिव्यांग व्यक्तींसाठी उपयुक्त पोशाखांवर संशोधन

**नागपूर शहरातील परिस्थिती** :

- नागपूर शहरातील दिव्यांग व्यक्तींसाठी तयार पोशाखाची उपलब्धता मर्यादित आहे.
- यामुळे अनेक दिव्यांग व्यक्तींना अयोग्य पोशाख वापरावा लागतो, ज्यामुळे त्यांच्या आत्मविश्वास आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.
- नागपूर शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयातील समाज कल्याण विभाग, किंवा जिल्हा परिषदेतील समाज कल्याण विभागांकडून अधिक माहिती मिळवता येईल.
- दिव्यांग उन्नती या संकेत स्थळावर सुद्धा आवश्यक माहिती उपलब्ध आहे.

**आवश्यक उपाय** :

- दिव्यांग व्यक्तींसाठी तयार पोशाखाची उपलब्धता वाढवणे आवश्यक आहे.
- यासाठी स्थानिक पातळीवर तयार पोशाख निर्माण करणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.
- दिव्यांग व्यक्तींना योग्य पोशाखाची निवड करण्यासाठी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.
- या विषयावर जनजागृती करणे आवश्यक आहे.
- योग्य पोशाख दिव्यांग व्यक्तींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवू शकतो. त्यामुळे, या विषयावर अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

**भविष्यातील दृष्टी:**

- **तंत्रज्ञानाचा वापर:** 3D प्रिंटिंग आणि रोबोटिक्स तंत्रज्ञानाचा वापर करून सानुकूलित पोशाख तयार करणे.
- **डिझाइनमध्ये सुधारणा:** दिव्यांग व्यक्तींच्या गरजांनुसार नवीन आणि सुधारित डिझाइन तयार करणे.
- **समान संधी:** दिव्यांग व्यक्तींसाठी फॅशन उद्योगात समान संधी निर्माण करणे. या उपक्रमांद्वारे, नागपूर जिल्ह्यातील हात व पायाने दिव्यांग व्यक्तींना फॅशनयुक्त आणि सुविधाजनक पोशाख उपलब्ध करून देणे शक्य होईल, ज्यामुळे त्यांचे जीवन अधिक सुलभ आणि सन्माननीय होईल.

**संदर्भ सूची :**


- वैरागडे उज्वला - वस्त्राच्या संकल्पना व फॅशन डिझायनिंग - २००९ प्रकाशन शशिकांत पिंगळा पुरे
- भांडारकर पी एल - सामाजिक संशोधन पद्धती - १९७६ दत्तासन प्रकाशन
- देऊसकर आशा - मानवी पोषक आणि आहार शास्त्राची मूलतत्वे १९९६ विद्या प्रकाशन
- https://etd.ohiolink.edu/apexprod/rws_etd/send_file/send?accession=kent1470244671&disposition=inline
- https://www.researchgate.net/publication/356506405_Fashion_industry_perceptions_of_clothing_design_for_persons_with_a_physical_disability_the_need_for_building_partnerships_for_future_innovation
- प्रेरणा सुरी (जुलै 2016)
- https://www.researchgate.net/publication/322133118_
- Functional_Clothing_for_The_Differently_Abled
- अयाचित आणि ठाकूर (2017)